# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

## मध्यवर्ती कार्यालय

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन
६१५, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, मुंबई- ४०० ०१३.
दूरध्वनी : ०२२-२४३०६७१७ / २४४२२७७५८
फॅक्स : ०२२-२४२१००१९

**कल्याण आयुक्त**
दूरध्वनी : ०२२-२४२२६४५ / २४३१८८१२,
इमेल : mlwbwc@gmail.com

**स्थापत्य अभियंता**
दूरध्वनी : ४३२२६८०८
इमेल : mlwbcivil@gmail.com

**लेखा व लेखा परीक्षा अधिकारी**
दूरध्वनी : ४३२२६८०२
इमेल : mlwbaao@gmail.com

**प्रशासन अधिकारी**
दूरध्वनी : ४३२२६८१०
इमेल : mlwbgad@gmail.com

**लेखा परीक्षा अधिकारी**
दूरध्वनी : ४३२२६८०३
इमेल : mlwbaudit@gmail.com

**सहाय्यक कल्याण आयुक्त (निधी)**
दूरध्वनी : ४३२२६८११, ४३२२६८१८
इमेल : mlwbconteeg@gmail.com

**लेखा अधिकारी**
दूरध्वनी : ४३२२६८३५.
इमेल : mlwbac@gmail.com

**सहायक कल्याण आयुक्त (कार्यक्रम)**
दूरध्वनी : ४३२२६८१६, ४३२२६८१७
इमेल : mlwbprog@gmail.com

**सहाय्यक कल्याण आयुक्त (संगणक)**
दूरध्वनी : ४३२२६८०९, ४३२२६८३०
इमेल : mlwbcomputer@gmail.com

**प्रसिध्दी व जनसंपर्क अधिकारी**
दूरध्वनी : ४३२२६८२५ / २६
इमेल : mlwbpro53@gmail.com

**विधी अधिकारी**
दूरध्वनी : ४३२२६८२७
इमेल : mlwbclegal@gmail.com



# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

### मंडळाचे ब्रीद :

शिस्त, सेवा, सुधार आणि समृद्धी.

### मंडळाचे ध्येय :

महाराष्ट्र राज्यात समाजाच्या विविध घटकातील नोंदणीकृत कामगारांना दर्जेदार कल्याणकारी योजना, कार्यक्रम व सुविधा पुरवून त्यांचे व त्यांच्या कुटुंबीयांचे जीवनमान उंचावणे, मंडळाच्या कल्याणकारी योजनांद्वारे त्यांची सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक वा मानसिक उन्नती घडविणे.

### मंडळाचे कार्य :

कामगार व कामगार कुटुंबियांकरिता कल्याणकारी सेवा उपलब्ध करून देणे.

- उत्तम खेळ व क्रीडा सुविधा
- अद्ययावत ग्रंथालय व वाचनालय
- आधुनिक शैक्षणिक सुविधा
- सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन
- रोजगार व स्वयंरोजगार विषयक कार्यक्रम
- आरोग्य विषयक कार्यक्रम
- इतर आधारित सेवा

### गुणवत्ता धोरण :

कामगारांचे सर्वंकष समाधान करणाऱ्या कल्याणकारी कार्यक्रमांचे नियोजनबद्ध व पद्धतशीर आयोजन करून मंडळाचे उद्दिष्ट साध्य करणे.

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

**अध्यक्ष**

मा. श्री. राजेंद्र गावित

**सदस्य**

**स्वतंत्र प्रतिनिधी**
श्री. नरेंद्र अण्णासाहेब पाटील
(आमदार, विधान परिषद)
श्री. यशवंत आनंद भोसले
प्रा. दत्तात्रय दिनकर चौगले
श्री. प्रमोद मोहोड
श्री. दिलीपदादा जगताप
श्री. नारायण दिवटे
श्री. बदरुज्जमा मो. आदिल

**कामगार प्रतिनिधी**
श्री. शिवाजी खटकाळे
श्री. अशोक पराडकर
श्री. गोविंद जनार्दन मोहिते
श्री. शिवाजी मोहनराव धर्माधिकारी
अ‍ॅड. एस. एम. तथा बाळासाहेब बागवान
श्री. रमेश गणेशराव सावरकर

**मालक प्रतिनिधी**
श्री. सुशील बापुसाहेब कुलकर्णी
श्री. चेतन खैराज डेढीया
श्री. हरिदास गोपाळ शेट्टी
श्री. मतीन अहमद बशीर
श्री. भुपेंद्र मडावी
श्री. सुरेश एस. केसरकर

**महिला प्रतिनिधी**
श्रीमती उर्मिला वैजनाथ बाईंग
डॉ. चेतना राजेंद्र दीक्षित
श्रीमती संजीवनी संजय शिसोदे
श्रीमती भाग्यश्री भालचंद्र भुर्के
श्रीमती संघजा भुजंग मेश्राम

**पदसिद्ध सदस्य**

प्रधान सचिव (वित्त), महाराष्ट्र शासन
प्रधान सचिव (कामगार), महाराष्ट्र शासन

**कल्याण आयुक्त**

नरेंद्रसिंह नागभिरे





# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

## परिचय

**मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ नुसार कामगार कल्याण व स्वायत्त मंडळाची स्थापना झाली. १ जुलै १९५३ रोजी स्थापन झाले "मुंबई कामगार कल्याण मंडळा"चे १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्या स्थापनेनंतर "महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ" असे नामांतर झाले.**

कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी कामगार कल्याण योजना राबविणारे महार देशातील अग्रगण्य राज्य आहे.

तत्कालिन मुंबई राज्य शासनाने १९३८ साली मुंबई शहरामध्ये डिलाईल रोड (सध ना. म. जोशी मार्ग) येथे पहिले कामगार कल्याण केंद्र स्थापन करून बहुसंख्येने कामगार असलेल्या वस्ती, गिरण्या, कारखाने या त्यांच्या कामाच्या ठिकाणी कल्याणकारी उप राबविण्यास सुरुवात केली. कामगारांना दारू, जुगार यासारख्या व्यसनांपासून परावृत्त आणि त्यांचा फावला वेळ चांगल्या रितीने व्यतीत करता यावा. त्यांना आपला विकास साधण संधी मिळावी हा यामागे शासनाचा हेतू होता. कामगार वसाहतीमध्ये वाचनालये, ग्रंथालये, आंत व मैदानी खेळ आणि अधून मधून करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करता यावेत या शासनाने कामगार कल्याण केंद्रे सुरू केली.

१९४६ साली तत्कालीन मुंबई राज्य शासनाने घोषणा केली की, कामगारांच्या सर्व उत्कर्षामागे फक्त शासनापुरतेच प्रयत्न मर्यादित न राखता कामगारांच्या संघटनांनी, मालकां स्थानिक संस्थांनी हे कार्य पार पाडले पाहिजे. देशाची खरीखुरी प्रगती नागरिकांच्या स्वाभा आंतरिक तळमळीबरोबरच त्यांच्या संपन्न चारित्र्याने होणार आहे. सर्वांगीण विकासासाठी शास केलेले कायदे सहायभूत होऊ शकतील परंतु "स्वावलंबनाद्वारे विकास " याला दुसरा प नाही.

तत्कालीन शासनाच्या कामगार कल्याणाच्या बदलत्या विचारांना पूरक असा नियोज व "एकत्रित कामगार कल्याणा"चा विचार साकार करण्यासाठी कामगार कल्याण काय आखणी केली आणि मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अन्वये जून १९ मध्ये मुंबई कामगार कल्याण अधिनियमाची निर्मिती केली. सुरूवातीस सदर अधिनियम महत्वाच्या कामगार वसाहतींपुरताच मर्यादित होता.

मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ नुसार कामगार कल्याण निधी व स्वायत्त मंडळाची स्थापना झाली. तेव्हापासून या मंडळाद्वारे कामगार व त्यांच्या कुटुंबियांसाठी कामाच्या ठिकाणाबाहेर कल्याणकारी योजना राबविण्यास सुरुवात झाली. १ जुलै १९५३ रोजी स्थापन झालेल्या "मुंबई कामगार कल्याण मंडळा"चे महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर "महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ" असे नामांतर झाले.

जून १९५३ मध्ये मुंबई राज्य शासनाने मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अन्वये कायदा करून औद्योगिक कामगारांच्या विकासासाठी स्वतंत्र वैधानिक मंडळाची स्थापना केली. त्यानुसार शासनाकडून ३० जून १९५३ रोजी त्यांच्या अधिपत्याखाली असलेली ५४ कामगार कल्याण केंद्रे कर्मचाऱ्यांसह या मंडळाकडे सुपूर्द केली. एकूण ५४ केंद्रांपैकी २ केंद्रे ही म्हैसूर शासनाकडे १९५९ मध्ये तर १३ केंद्रे गुजरात शासनाकडे १९६० साली हस्तांतरित करण्यात आली. त्यानंतर १९६२ मध्ये विदर्भ व मराठवाडा विभागातील ३० केंद्रांचा कार्यभार शासनाने या मंडळाकडे सोपविला.

### पहिले वैधानिक कामगार कल्याण मंडळ

शासनाने मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ हा कामगार कल्याण विषयक महत्वाचा कायदा जून १९५३ मध्ये मंजूर केला. त्या कायद्यांतर्गत कामगार कल्याण कार्यासाठी स्वतंत्र कल्याण निधी निर्माण करून कामगार कल्याणकारी कार्यक्रम पार पाडण्याची जबाबदारी कामगार, मालक आणि शासन यांच्या स्वायत्त मंडळाकडे म्हणजेच (त्यावेळच्या मुंबई कामगार कल्याण मंडळाकडे) आताच्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे सोपविण्यात आली. शासनामार्फत या मंडळासाठी कामगारांचे, मालकांचे, महिलांचे तसेच स्वतंत्र सदस्य नियुक्त करण्यात येतात. या मंडळावर २६ सदस्य असून त्यामध्ये अध्यक्षांचा समावेश आहे.या सदस्यांमध्ये ६ कामगार प्रतिनिधी, ६ मालक प्रतिनिधी, ६ महिला प्रतिनिधी आणि ८ स्वतंत्र प्रतिनिधींचा समावेश आहे. या मंडळाचा कालावधी ३ वर्षांचा असतो. ३ महिन्यातून कमीत कमी एकदा या मंडळाची बैठक होते. मंडळाचे अध्यक्ष या बैठकीत सूत्रसंचालन करतात. आता महाराष्ट्र शासनाने त्यांच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. ०७ जानेवारी २००२ च्या अध्यादेशानुसार शासनाचे वित्त विभागाचे प्रधान सचिव किंवा त्यांचे नियोजित प्रतिनिधी आणि कामगार विभागाचे प्रधान सचिव किंवा त्यांचे नियोजित प्रतिनिधी यांची महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळावर मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ४ च्या तरतुदीनुसार पदसिद्ध सदस्य म्हणून नियुक्ती केलेली आहे.





## महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियमाच्या कलम - ३ नुसार विविध कल्याणकारी कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी हा कामगार कल्याण निधी स्थापन करण्यात आला आहे. अधिनियमाच्या कलम- ३ नुसार आर्थिक सहाय्य मंडळाला मिळते.

१) कामगार कर्मचाऱ्यांकडून वसूल करण्यात आलेल्या सर्व दंडाच्या रकमा.

२) कलम ६-अ (९) नुसार अवितरित संचयनाच्या रकमा.

३) सन १९७१ मधील बदलांन्वये अधिनियमाच्या कलम - ६ ब ब नुसार कामगार, मालक व शासन अशी त्रिपक्षीय वर्गणी ६ महिन्यातून एकदा मंडळाला मिळते. सदर वर्गणी माहे जून व माहे डिसेंबरच्या वेतनातून कपात करण्यात येते. "कारखाने अधिनियम १९४८" अंतर्गत येणारे सर्व कारखाने तसेच "बॉम्बे शॉप्स अॅन्ड एस्टॅब्लिशमेंट अॅक्ट १९४८" अंतर्गत येणारी सर्व दुकाने व आस्थापना, (ज्यामध्ये ५ किंवा जास्त कामगार काम करीत आहेत) "मोटार वाहतूक कामगार कायद्यां"तर्गत येणारे कामगार या सर्वांकडून मंडळाला खालीलप्रमाणे अंशदान मिळते.

**सध्याचे प्रति सहामाहीचे त्रिपक्षीय वर्गणी दर पुढीलप्रमाणे -**

| तपशील | कामगार (रूपये) | मालक (रूपये) | शासन (रूपये) |
|---|---|---|---|
| अ) दरमहा रू.३,०००/- पर्यंत पगार घेत असलेले कामगार | ६.०० | १८.०० | १२.०० |
| ब) दरमहा रू. ३०००/- हून अधिक पगार घेत असलेले कामगार | १२.०० | ३६.०० | २४.०० |

४) कलम ६-(ब) नुसार दंडार्थ मिळणारी व्याजाची रक्कम

५) मंडळास मिळणा-या कोणत्याही ऐच्छिक देणग्या.

६) कलम (५) नुसार वळती केलेली कोणतीही निधीची रक्कम

७) कलम ८ नुसार कर्जाऊ घेतलेली रक्कम.

८) शासनाकडून कर्ज किंवा मदत म्हणून मिळालेली रक्कम.

मंडळ या निधीचे विश्वस्त असून, कामगार कल्याण कायद्याच्या कलम ७ (२) अन्वये या निधीचा विनियोग करण्यासंबंधी कामगार कल्याण कार्याची चौकट ठरवून देण्यात आलेली आहे.

**सदर निधीचा पुढीलप्रमाणे विनियोग केला जातो :**

१) वाचनालये व ग्रंथालये यांचा समावेश असणारी सामुदायिक आणि सामाजिक शिक्षण केंद्राची सोय.

२) शिशु मंदिरे, शिशु संगोपनालये, अभ्यासिका इ. द्वारे सामुदायिक गरजांकरता तरतूद

३) खेळ व खेळ स्पर्धा (शरीर संवर्धन इ.)

४) सहली, सफरी

५) मनोरंजनात्मक व इतर करमणुकीचे कार्यक्रम

६) कामगार वर्गातील स्त्रियांसाठी व बेरोजगारांसाठी स्वयंरोजगार शिबिर व व्यवसाय प्रशिक्षण केंद्र

७) सामाजिक स्वरूपाचे सामुदायिक कार्यक्रम

८) कामगारांची सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी तसेच त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी शासनाच्या दृष्टीने उपयुक्त असे कार्यक्रम

महाराष्ट्र राज्यात २२६ कामगार कल्याण केंद्रे कार्यान्वित आहेत. तसेच मुंबई, नागपूर आणि पुणे येथे प्रत्येकी एक असे तीन सुसज्ज असे प्रकल्प आहेत. साधारणपणे त्या त्या ठिकाणच्या जागेची उपलब्धता, सोयी व सुविधा यावरून कामगार कल्याण केंद्रांची वर्गवारी ठरविण्यात येते. या वर्गवारीनुसार कामगार कल्याण केंद्राची कामगार क्रीडा भवन, कामगार कल्याण भवन, ललित कला भवन, कामगार कल्याण केंद्र व उपकेंद्र अशा प्रकारात विभागणी करण्यात आली आहे. याशिवाय ग्रामीण केंद्रे, सहकारी साखर कारखान्यांच्या परिसरातील समिती पद्धतीवर सुरू करण्यात आलेली केंद्रे, आदिवासी विभागातील केंद्रे असे केंद्रांचे काही प्रकारही अस्तित्वात आहेत. याशिवाय ज्या कामगार विभागात नियमित स्वरूपाची केंद्रे नाहीत अशा कामगार वसाहतीमधून "कामगार वसाहतीतील कल्याण कार्य" या सदराखाली काही प्रासंगिक स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.





# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

## प्रशासकीय संरचना

**मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांच्या अधिपत्याखाली मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अकोला व नागपूर असे सात विभाग निर्माण करण्यात आले आहेत. त्याद्वारे मंडळाचे प्रशासकीय कार्य चालते.**

कल्याण आयुक्त हे मंडळाचे प्रमुख कार्यकारी अधिकारी असून मंडळाचे विविध कल्याणकारी उपक्रम राबविण्याची जबाबदारी ते पार पाडतात. मंडळाच्या सर्व प्रशासकीय व वित्तीय निर्णयांची अंमलबजावणी कल्याण आयुक्तांच्या मार्फत केली जाते.

प्रशासकीय सोयीसाठी मध्यवर्ती कार्यालयाच्या स्तरावर कार्यक्रम विभाग, सामान्य प्रशासन विभाग, लेखा व लेखा परीक्षा विभाग, निधी वसुली विभाग, बांधकाम विभाग, प्रसिद्धी व जनसंपर्क विभाग, विधी विभाग, संगणक विभाग अशी कामाची विभागणी करण्यात आली असून, या प्रत्येक विभागासाठी एका वरिष्ठ अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे. प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने विभागातील कार्यालयाच्या ठिकाणी सहायक कल्याण आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. प्रत्येक विभागाच्या कार्यकक्षेत किमान २ किंवा ३ गट कार्यालये कार्यरत असून अशी राज्यातील एकूण १८ गट कार्यालये येतात.

एका गट कार्यालयाच्या कक्षेत साधारण १२ ते १८ कामगार कल्याण केंद्रे समाविष्ट असून या कामगार कल्याण केंद्रांमार्फत सामाजिक, शैक्षणिक, कला आणि क्रीडाविषयक विविध कल्याणकारी कार्यक्रम कामगार आणि कुटुंबीयांसाठी राबविण्यात येत असतात. हे कार्यक्रम केंद्र प्रमुखांमार्फत यथोचितरित्या पार पाडून घेण्याची जबाबदारी या गट कार्यालयाचे कामगार कल्याण अधिकारी यांच्यावर सोपवलेली असते.

प्रत्येक कामगार कल्याण केंद्राच्या जागेच्या व कामाच्या व्याप्तीनुसार या ठिकाणी कल्याण निरीक्षक / केंद्र संचालक / सहा. केंद्र संचालक यांची नेमणूक करण्यात येते. त्याचप्रमाणे केंद्रात महिला व बालविभागासाठी केंद्र उपसंचालिका, केंद्र महिला कल्याण सहायिका, शिशुमंदिर शिक्षिका यांची नियुक्ती करण्यात येते. तसेच केंद्रातील कार्यक्रमास मदतनीस म्हणून केंद्रसेवक कार्यरत असतात.

मुंबईतील हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, कामगार कल्याण भवन,

राजे रघुजीनगर, नागपूर व कामगार कल्याण भवन, सहकार नगर, पुणे हे मंडळाचे तीन महत्वाचे बहुउद्देशीय प्रकल्प आहेत.

कामगार कल्याण केंद्राची वेळ सकाळी ८.०० ते रात्री ८.३० अशी आहे. केंद्राची सकाळी ११ ते सायंकाळी ५ ही वेळ फक्त महिला व मुलांच्या कार्यक्रमांकरिता राखून ठेवलेली असते. इतर वेळेत हे केंद्र सर्वांसाठी खुले असते. सार्वजनिक सुट्टी, दुसरा व चौथा शनिवार आणि रविवारी ही केंद्र बंद असतात.

मंडळाच्या प्रत्येक कामगार कल्याण केंद्रावर दोन वर्षांच्या कालावधीसाठी केंद्र कार्यक्रम सल्लागार समितीची नेमणूक करण्यात येते. या सल्लागार समितीमध्ये केंद्र परिसरातील वकील, डॉक्टर, शिक्षक, सामाजिक व क्रीडा क्षेत्रातील कार्यकर्ते, गुणवंत कामगार आणि महिला अशा मान्यवर व्यक्तींचा समावेश असतो. या सल्लागार समितीचे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून कामगार कल्याण अधिकारी आणि चिटणीस म्हणून केंद्र प्रमुख हे काम पाहतात. संबंधित कामगार कल्याण अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दर तीन महिन्यांनी बैठक आयोजित करुन मंडळाच्या नियमांच्या अधिन राहून केंद्रात आयोजित केल्या जाणाऱ्या कल्याणकारी उपक्रम व कार्यक्रम यांची रूपरेषा ठरविली जाते.





# मंडळातील केंद्रांचे वर्गीकरण

## मंडळाचे प्रकल्प

### अ) कामगार क्रीडा भवन, एलफिन्स्टन, मुंबई

कामगार कल्याण मंडळाचे पहिले सुसज्ज बहुउद्देशीय असे कामगार क्रीडा भवन असून या भवनाचे उद्घाटन तत्कालीन राष्ट्रपती श्री. व्ही. गिरी यांच्या शुभहस्ते दि. १८ ऑगस्ट १९७१ रोजी झाले. ह्या वास्तुमध्ये ऑलिम्पिक दर्जाचा जलतरण तलाव, खुला रंगमंच, कबड्डी, अॅथलेटिक्स इ. मैदानी खेळांसाठी क्रीडांगण, व्यायामशाळा, योगावर्ग, बंदिस्त बॅडमिंटन कोर्ट, टेबल टेनिस कोर्ट व इतर आंतरगृह खेळ, सुसज्ज ग्रंथालय, अभ्यासिका, समिती सभागृह, पुरुष व स्त्रियांसाठी शिवणवर्ग, शिशुमंदिर इ. सुविधा आहेत.

### ब) कामगार कल्याण भवन, राजे रघुजी नगर, नागपूर

हा मंडळाचा दुसरा बहुउद्देशीय प्रकल्प आहे. या प्रकल्पात जलतरण तलाव, व्यायामशाळा, ग्रंथालय, अभ्यासिका, संगणक प्रशिक्षणवर्ग, सरकारमान्य व मंडळाचा शिवणवर्ग, फॅशन डिझायनिंग, शिशुमंदिर, टेबल टेनिस, योगा, स्वयंरोजगार प्रशिक्षण, समिती सभागृह इत्यादी सुविधा आहेत.

### क) कामगार कल्याण भवन, सहकार नगर, पुणे

हा मंडळाचा तिसरा प्रकल्प असून या ठिकाणी जलतरण तलाव, व्यायामशाळा, ग्रंथालय, अभ्सासिका, संगणक प्रशिक्षणवर्ग, सरकारमान्य व मंडळाचा शिवणवर्ग, फॅशन डिझायनिंग, शिशुमंदिर, टेबल टेनिस, योगा, स्वयंरोजगार प्रशिक्षण, इत्यादी सुविधा आहेत.

### कामगार कल्याण भवन / ललित कला भवन

विविध मैदानी खेळांसाठी आवश्यक असलेल्या मोकळ्या मैदानांसह योग्य बांधणीची इमारत, त्यात बैठ्या व मैदानी खेळांची सोय, तसेच व्यायामशाळा, कुस्तीचे आखाडे, वाचनालय, ग्रंथालय, अभ्यासिका, शिवण वर्ग, संगणक प्रशिक्षण वर्ग, शिशुमंदिर, बालसंगोपनालय, खुले नाट्यगृह, संगीतवर्ग इ. उपक्रम राबविले जातात.

## कामगार कल्याण केंद्र

स्वमालकीच्या अथवा भाड्याने घेतलेल्या जागेत सुरू केलेल्या ह्या केंद्रातून प्रामुख्याने आंतरगृह खेळ, मैदानाची सोय असल्यास मैदानी खेळ, शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यक्रम, वाचनालय आणि ग्रंथालय, महिला व मुलींकरीता शिवण, हस्त व्यवसाय वर्ग, फॅशन डिझायनिंग, लहान मुला-मुलींसाठी शिशुमंदिरे इ. सुविधा जागेच्या व्याप्तीनुसार उपलब्ध करुन दिल्या आहेत.

## कामगार कल्याण उपकेंद्र

झोपडपट्टी असलेल्या श्रमिकांच्या भागात एखाद्या छोट्याशा जागेत ही केंद्रे असून या केंद्रातून प्रामुख्याने आरोग्य शिक्षणविषयक कार्यक्रम आणि काही आंतरगृह खेळ, वाचनालय, स्त्रियांसाठी शिवणवर्ग, लहान मुलामुलींसाठी शिशु मंदिर, विविध खेळ स्पर्धा व मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

## ग्रामीण केंद्र

मंडळाने कामगार कल्याण कार्याच्या सन १९६३-६४ या रौप्य महोत्सवी वर्षी ग्रामीण भागातील श्रमिकांसाठी हिंगणा-नागपूर, गणोरी-औरंगाबाद, माडगुळ-पुणे व कुळगाव-बदलापूर (ठाणे) येथे ४ केंद्रे प्रायोगिक स्वरूपात उघडली होती. सन १९८८-८९ या सुवर्ण महोत्सवी वर्षात पिंपळगाव बसवंत-नाशिक येथे आणखी १ केंद्र उघडले आहे. या केंद्रातून मुलांसाठी शिशु मंदिर, स्त्रियांसाठी शिवण वर्ग तसेच सर्वांसाठी वाचनालय, ग्रंथालय, बैठे व मैदानी खेळ यांसारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

## समिती पातळीवरील केंद्रे

वरील केंद्राशिवाय सन १९८३-८४ पासून मंडळाने काही साखर कारखान्यांच्या सहकार्याने तेथील परिसरात कामगार कल्याण केंद्रे उघडलेली आहेत. त्या केंद्रांमध्ये देखील मुलांसाठी शिशु मंदिर, महिलांसाठी शिवण वर्ग, तसेच सर्वांसाठी वाचनालय, ग्रंथालय, मैदानी खेळ व बैठे खेळ इत्यादींची सोय उपलब्ध केलेली आहे.





## कामगार वसाहतीत कल्याण कार्य

सर्वच कामगार वसाहतीत जागेच्या व आर्थिक अडचणींमुळे कामगार कल्याण केंद्र उघडणे मंडळाला शक्य होत नाही. अशा ठिकाणी मनोरंजनात्मक, शैक्षणिक, खेळ व स्पर्धा इ. कल्याणकारी कार्यक्रम राबविण्यात येतात. वर्षभरात साधारणपणे ४ प्रासंगिक स्वरूपाचे कार्यक्रम आयोजित करून मंडळाच्या कल्याणकारी कार्याचा फायदा या वसाहतीतील कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना मिळवून देण्यात येतो.

| क्र. | केंद्राचे प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १. | प्रकल्प | ०३ |
| २. | कामगार कल्याण भवन | १५ |
| ३. | ललित कला भवन | २१ |
| ४. | कामगार कल्याण केंद्र/उपकेंद्र | १८७ |
| | एकूण | २२६ |

# मंडळाचे कल्याणकारी उपक्रम

## मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत कामगार कल्याण निधीची वर्गणी भरणाऱ्या कामगार व कामगार कुटुंबीयांसाठी मंडळाचे कल्याणकारी उपक्रम

### शिशुमंदिर

कामगार कल्याण विभागात बाल कल्याणाची पहिली मुहुर्तमेढ शिशुसंस्कार शाळा सन १९४० मध्ये ललित कला भवन, डिलाईल रोड येथे रोवली गेली. शिशुमंदिर हा मंडळाचा एक महत्वाचा उपक्रम असून या उपक्रमांतर्गत शिशुमंदिर बालकांना मराठी बरोबर इंग्रजी विषयाचेही शिक्षण देण्यात येते. शिशुमंदिर मुलांना दररोज सकस आहार, मोफत गणवेश पुरविण्यात येतो. माहे सप्टेंबर व डिसेंबर या महिन्यात बालरोग तज्ज्ञ डॉक्टरांकडून बालकांची वैद्यकिय तपासणी केली जाते. निसर्गरम्य ठिकाणी मुलांची शैक्षणिक सहल आयोजित करण्यात येते.

### शिवणवर्ग / हस्तकला वर्ग

केंद्र परिसरातील कामगार कुटुंबिय महिलांसाठी शिवण व हस्तव्यवसाय वर्ग चालविण्यात येतात. काही ठिकाणी शासनमान्य शिवण वर्गही सुरू करण्यात आलेले आहेत. नाममात्र प्रवेश शुल्क भरून या वर्गात प्रवेश दिला जातो. परीक्षेत प्रथम येणाऱ्या कामगार कुटुंबिय महिलेस मंडळाच्या वतीने अनुदान तत्वावर शिवणयंत्र देण्यात येते.

### फॅशन डिझायनिंग / सौदर्य शास्त्र प्रशिक्षण

सध्या काळाची गरज लक्षात घेऊन महिलांना स्वत:चा उद्योग सुरू करता यावा यासाठी सौदर्य शास्त्र व फॅशन डिझायनिंग (बेसिक) प्रशिक्षणाचे आयोजन मंडळ सातत्याने करीत आहे. गट स्तरावर सर्व ठिकाणी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येतात.

### वाचनालय / ग्रंथालय

कामगार कुटुंबीयांना वाचनाची आवड निर्माण व्हावी तसेच त्यांना आजूबाजूला घडणाऱ्या विविध घटनांची व जगातील दैनंदिन घडामोडीची माहिती व्हावी, त्यांच्यामध्ये असलेली वाचनाची आवड व गोडी तसेच जिज्ञासा वाढीस लागावी या उद्देशाने राज्यातील प्रत्येक केंद्रांत वाचनालय तसेच जागेच्या उपलब्धतेनुसार केंद्रांमध्ये ग्रंथालय व ज्ञानसंवर्धन विभाग चालविण्यात येतो.

### अभ्यासिका

आजच्या धकाधकीच्या जीवनात विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी निवांतपणा मिळणे जिकिरीचे झाले आहे. म्हणून मंडळाच्या वतीने कामगारांच्या पाल्यांना गर्दी-गोंगाटापासून शांत ठिकाणी अभ्यासावर





लक्ष केंद्रित करता यावे याकरिता कामगार कल्याण भवन व ललित कला भवन येथे अभ्यासिका सुरू केलेल्या आहेत. अभ्यासिकेतील सभासदांकरिता स्पर्धा परिक्षांची पुस्तकेही उपलब्ध करून देण्यात येतात.

### संगणक प्रशिक्षण

मंडळाच्या वतीने कामगार कल्याण भवन, ललित कला भवन व कामगार कल्याण केंद्रातून (जागेच्या उपलब्धतेनुसार) कामगार व कामगार कुटुंबियांसाठी माफक शुल्कात संगणक प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आले आहेत. या प्रशिक्षण वर्गातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारे संगणकीय प्रोग्रामिंग, डाटाबेस मॅनेजमेंट सिस्टिम, टॅली, डीटीपी, इंटरनेट, कोरल ड्रॉ, फोटोशॉप, एमएस-सीआयटी (MS-CIT) आदी विविध विषयांचा अभ्यासक्रम शिकविण्यात येतो.

### आरोग्यधाम

मंडळाच्या वतीने कामगार कल्याण भवन / ललित कला भवन या ठिकाणी व काही प्रमुख कामगार कल्याण केंद्रात आरोग्यधाम (व्यायामशाळा) सुरू केलेल्या आहेत. यात नाममात्र प्रवेश शुल्क भरून प्रवेश दिला जातो. व्यायामशाळेमध्ये मंडळाच्या वतीने प्रशिक्षक नियुक्त केले जातात.

### योगा वर्ग

योगा ही आजच्या जीवनाची एक महत्वपूर्ण प्रणाली म्हणून विकसित होत आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ या क्षेत्रातील तज्ज्ञ व अनुभवी संस्थांच्या सहकार्याने योगा वर्गाचे आयोजन राज्यातील महत्वाच्या कामगार कल्याण केंद्रांतून करत आहे.

### कराटे वर्ग

कामगारांच्या पाल्यांना स्वसंरक्षणाचे धडे गिरविता यावे याकरिता मंडळाच्या वतीने नाममात्र प्रवेश शुल्क आकारून कराटे प्रशिक्षण वर्ग सुरू केले आहे.

### संगीत वर्ग

कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांमध्ये उपजतच असलेले संगीतविषयक सुप्त कलागुण अधिक विकसित व्हावेत आणि या क्षेत्रातील मार्गदर्शन मिळावे या हेतूने मंडळाच्या वतीने संगीत वर्ग सुरू करण्यात आलेले आहेत. या वर्गातील सभासदांना सूरपेटी, तबला-डग्गा व तत्सम वाद्यांच्या माध्यमातून तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून मार्गदर्शन केले जाते.

# कार्यक्रम

**मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत कामगार कल्याण निधीची वर्गणी भरणाऱ्या कामगार व कामगार कुटुंबीयांसाठी मंडळाचे कल्याणकारी कार्यक्रम**

## रोजगार, स्वयंरोजगार व व्यवसाय प्रशिक्षण

कामगार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी विभागीय व गट कार्यालयांच्या स्तरावर "व्यवसाय प्रशिक्षण शिबिराचे" प्रतिवर्षी आयोजन करण्यात येत असते. या शिबिरात सहभागी होणाऱ्या शिबिरार्थींना मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र आदी ठिकाणच्या तज्ज्ञ व्यक्तींना निमंत्रित करण्यात येते. त्यांच्याकडून विविध उद्योग तसेच लघु व गृह उद्योगांच्या संदर्भात शिबिरार्थींना सविस्तर माहितीपूर्ण मार्गदर्शन करण्यात येते.

## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व्याख्यानमाला

युपीएससी, एमपीएससी या स्पर्धा परीक्षांना बसलेल्या कामगारांच्या पाल्यांकरिता मंडळाच्या वतीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व्याख्यानमाला आयोजित करण्यात येते. त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तिंना निमंत्रित करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दिले जाते.

## गुणवत्ताप्राप्त कामगारांचे पाल्य/पालक व गुरुजनांचा सत्कार

माध्यमिक व उच्च माध्यमिक (१०/१२वी) परीक्षेत सर्वोत्कृष्ट गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या कामगार पाल्य, पालक आणि गुरूजनांचा सत्कार समारंभ प्रतिवर्षी महाराष्ट्रातील सर्व विभागीय स्तरावर आयोजित करण्यात येतो. यामध्ये कामगार कुटुंबीय पाल्यांना रुपये ५०००/- ची विशेष शिष्यवृत्ती देण्यात येते.

## माध्यमिक शालांत परीक्षेच्या विद्यार्थ्यांसाठी उजळणी वर्ग

कामगार कुटुंबातील विद्यार्थ्यांना माध्यमिक शालांत परीक्षा सुलभ जावी व परीक्षा तंत्रातील योग्य मार्गदर्शन मिळावे म्हणून मंडळाच्या वतीने जानेवारी ते मार्च या कालावधीत महाराष्ट्रातील १८ गट कार्यालयांच्या स्तरावर माध्यमिक शालांत परीक्षा विद्यार्थ्यांसाठी उजळणी वर्गाचे तज्ज्ञ शिक्षकांच्या सहकार्याने आयोजन करण्यात येते.

## "शालांत परीक्षेनंतर पुढे काय?" प्रदर्शन व व्याख्यानमाला

माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मुलांना पुढील शिक्षण/व्यवसाय याबाबत मार्गदर्शन





व्हावे या उद्देशाने "माध्यमिक शालांत परीक्षेनंतर पुढे काय?" प्रदर्शन व व्याख्यानमालेचे महाराष्ट्रातील १८ गट कार्यालयांच्या स्तरावर आयोजन करण्यात येते.

## व्यक्तिमत्व विकास शिबिर

राज्यात गटस्तरावर तज्ज्ञ मार्गदर्शक व समूपदेशकांच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास शिबिरांचे आयोजन करण्यात येते.

## हस्तव्यवसाय प्रदर्शन

महाराष्ट्रातील मुख्य केंद्रांच्या ठिकाणी हस्त व्यवसाय प्रदर्शन शिबिराचे आयोजन केले जाते. मंडळाच्या हस्तकला उपक्रमातील विद्यार्थिनींनी भरतकाम, क्रोशाचे विणकाम, ग्लास पेंटिंग्ज, सॉफ्ट टॉईज इ. नानाविध प्रकारात केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री या कार्यक्रमांच्या माध्यमातून केली जाते.

## खेळ व खेळ स्पर्धा प्रशिक्षण शिबिर

मैदानी व आंतरगृह खेळांची शास्त्रशुद्ध माहिती व्हावी यासाठी खेळ स्पर्धा व प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात येते. यामध्ये प्रामुख्याने टेबल टेनिस, बॅडमिंटन, कुस्ती, कबड्डी आदी खेळांचे प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येतात.

## आरोग्य शिबिर

मंडळाच्या वतीने गटकार्यालयाच्या स्तरावर कामगार कुटुंबियांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर, नेत्रचिकित्सा शिबिर, रक्तदान शिबिर आदी आरोग्यविषयक तपासणी शिबिरांचे सातत्याने आयोजन करण्यात येते. सदर शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांना निमंत्रित करून मार्गदर्शन करण्यात येते.

## कामगार नाट्य प्रशिक्षण शिबिर

मंडळाच्या महाराष्ट्रातील विभागीय व गट कार्यालयांच्या स्तरावर "नाट्य प्रशिक्षण शिबिर" आयोजित करण्यात येते. या शिबिरात ख्यातनाम नाटककार, दिग्दर्शक, अभिनेते, नेपथ्यकार, प्रकाश योजनाकार, संगीतकार आदींच्या समवेत ज्येष्ठ नाट्य समीक्षक यांचेही बहुमोल मार्गदर्शन नवोदित कलावंतांना उपलब्ध करून दिले जाते.

### कामगार रंगकर्मींचा सत्कार

५ नोव्हेंबर हा दिवस "रंगभूमी दिन" म्हणून मंडळाच्या सर्व विभागीय स्तरावर साजरा करण्यात येतो. अखिल भारतीय नाट्य परिषदेने गौरविलेल्या कामगार रंगभूमीच्या नाट्यकर्मींचा व कामगार कलावंतांचा मंडळाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात येतो.

### कामगारांसाठी सहल व सफरी

कामगार व त्यांच्या कुटुंबियांसाठी वर्षातून एकदा ऐतिहासिक, धार्मिक अथवा निसर्गरम्य ठिकाणी मंडळाकडून सहलीचे आयोजन करण्यात येते. ही योजना राज्यातून प्रत्येक कामगार कल्याण केंद्रामधून राबविली जाते. विविध आस्थापनांतील कमीतकमी पंचवीस कामगार किंवा कामगार कुटुंबियांच्या १८ वर्षांवरील सदस्यांना या सहलीत प्रवेश दिला जातो.

### वासंतिक व्याख्यानमाला

महाराष्ट्रातील मंडळाच्या १८ गट कार्यालयांच्या स्तरावर प्रतिवर्षी विविध प्रबोधनात्मक आणि कामगारांच्या जिव्हाळ्याच्या विषयांवर "वासंतिक व्याख्यानमाला" आयोजित करण्यात येतात. यामध्ये क्रीडा, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रातील प्रथितयश व्यक्तींना निमंत्रित करण्यात येते.

### जागतिक लोकसंख्या दिन

११ जुलै हा दिवस जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये एका अपत्यावर किंवा दोन मुलींवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेल्या कामगार दाम्पत्यांचा शाल, श्रीफळ व संसारोपयोगी वस्तू देऊन सत्कार करण्यात येतो.

### महात्मा गांधी स्मृती सप्ताह

२ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जन्मदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या निमित्त परिसंवाद, व्याख्याने तसेच महात्मा गांधी स्मृती सप्ताह निमित्त कामगारांसाठी भजन स्पर्धा व महिलांकरिता खुली भजन स्पर्धा आयोजित करण्यात येते.

### जागतिक महिला दिन

८ मार्च या जागतिक महिला दिनानिमित्त मंडळाच्या सर्व गटस्तरावर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. रॅली, परिसंवाद, कर्तुत्वान महिलांचा सत्कार, व्याख्याने, स्पर्धा आदी कार्यक्रमांचा यामध्ये अंतर्भाव असतो.





## रोजगाराभिमुख प्रशिक्षण



### इंग्रजी व विदेशी भाषा संभाषण / लेखन प्रशिक्षण

कामगार व कामगार कुटुंबीयांना रोजगाराभिमुख विदेशी भाषांचे लेखन व संभाषणासाठी आवश्यक ज्ञान व्हावे याकरिता मंडळाने हा उपक्रम नव्यानेच सुरु केला आहे. या वर्गात इंग्रजी, फ्रेंच, जॅपनिज, जर्मन, रशियन, चायनिज या भाषांचे प्रशिक्षण देण्यात येते. सदर प्रशिक्षणाचा कालावधी तीन ते सहा महिन्यांचा आहे. माफक शुल्कात संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांमार्फत विद्यार्थ्यांना विदेशी भाषांचे संभाषण व लेखन प्रशिक्षण दिले जात आहे. तसेच व्यक्तिमत्व विकासावरही विशेष लक्ष दिले जात आहे. मंडळाच्या राज्यभरातील १८ गट कार्यालयाच्या स्तरावर हे वर्ग सुरू आहेत.

### वाहन चालक प्रशिक्षण

वार्षिक उत्पन्न एक लाख ऐंशी हजार आहे अशा अल्प उत्पन्न गटातील कामगारांच्या पाल्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात याकरिता चार चाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण दिले जाते. या करिता नाममात्र रू. ५००/- प्रशिक्षण शुल्क आकारण्यात येते. मारूती सुझुकी या नामवंत संस्थेच्या मदतीने हे प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षण कालावधी २१ दिवसांचा असतो. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षणार्थींना शिकाऊ वाहन चालक परवाना दिला जातो. शैक्षणिक पात्रता किमान इयत्ता ८ वी ते कमाल १२ वी असावी. मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, औरंगाबाद, बारामती, कोल्हापूर, सोलापूर, नागपूर, नाशिक, जळगाव, अमरावती, पुणे आदि महत्वाच्या शहरामध्ये हे वर्ग सुरू आहेत.

### रोजगाराभिमुख प्रशिक्षण

कामगार पाल्यांना रोजगाराचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन द्यावी या उद्देशाने टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस् (टीसीएस) या संस्थेमार्फत विनामूल्य प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षणमध्ये इंग्रजी संभाषण, मुलाखत कौशल्य, व्यक्तिमत्व विकास आणि संगणक ज्ञान यांचा समावेश असतो. प्रशिक्षण कालावधी २० ते २५ दिवसांचा असतो. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र तसेच टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस् मार्फत मुलाखत घेऊन उत्तीर्ण विद्यार्थ्यांना रुपये १२ ते १५ हजारापर्यंत मासिक उत्पन्नाची नोकरी देण्यात येते. पदवीच्या शेवटच्या वर्षात अथवा पदवीधर किंवा समकक्ष शैक्षणिक पात्रता असलेला कामगार पाल्य या प्रशिक्षणाचा लाभ घेऊ शकतो.

# सांस्कृतिक कार्यक्रम



## कामगार नागरी नाट्य महोत्सव

सन १९५३ पासून अखंडपणे सुरू असलेल्या या कामगार नाट्यस्पर्धेने आजपर्यंत अनेक नाट्यकर्मींना व्यासपीठ/कलावंत म्हणून ओळख मिळवून दिलेली आहे. मंडळाच्या सात विभागीय स्तरावर प्राथमिक कामगार नाट्यमहोत्सव स्पर्धेत प्रथम व द्वितीय पारितोषिक प्राप्त नाट्य संघांची अंतिम राज्यस्तरीय कामगार नाट्यस्पर्धेकरिता निवड केली जाते. स्पर्धेत सर्वोत्कृष्ट सांघिक पारितोषिकांबरोबरच वैयक्तिक पारितोषिक देण्यात येतात. नाट्यसंघांना सादरीकरण खर्च, कमीत कमी दराचा प्रवासखर्च, नाटकासाठी लागणारी प्राथमिक साधनसामुग्री मंडळाकडून देण्यात येते.

## औद्योगिक व व्यावसायिक कामगार नाट्य महोत्सव

औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी मंडळाने सन २००६ पासून स्वतंत्र नाट्यस्पर्धा घेण्याचा निर्णय घेतला आहे. या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत येत असलेले उद्योग आणि आस्थापना यांच्या नाट्यसंघांना या स्पर्धेत सहभागी होता येते.

## महिला नाट्य महोत्सव

महिलांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा व त्यांच्यातील कलागुण विकसित व्हावे याकरिता मंडळाच्या वतीने राज्यातील १८ गटस्तरांवर महिला नाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

## बालनाट्य महोत्सव

मुला-मुलांमधील कलागुणांना वाव मिळावा व त्यांच्यातील कलागुण हेरून त्यांना योग्य वेळी व्यासपीठ उपलब्ध करुन देणे, यादृष्टीने मंडळाच्या वतीने बालनाट्य महोत्सवाचे आयोजन गट स्तरावर करण्यात येते.

## खुली समरगीत / स्फूर्तीगीत स्पर्धा

९ ऑगस्ट १९४२ क्रांती दिनाची स्मृती चिरंतन रहावी या उद्देशाने सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. माहे जुलै महिन्याच्या दुस-या पंधरवड्यात १८ गट कार्यालयांच्या ठिकाणी





प्राथमिक स्पर्धा घेण्यात येते आणि दिनांक ९ ऑगस्ट रोजी क्रांतीदिनी राज्यस्तरीय स्पर्धा संपन्न होते.

## राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबिर

कामगार व कामगार कुटुंबियांना भजनाच्या विविध प्रकारांची माहिती व्हावी तसेच गायन, वादन याबाबत शास्त्रोक्त आकलन व्हावे व भजनातून समाजप्रबोधन कसे करावे याची माहिती व्हावी या दृष्टीने मंडळाच्या वतीने कामगार भजन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन प्रतिवर्षी धार्मिक स्थळी करण्यात येते.

## राज्यस्तरीय भजन स्पर्धा

राज्यातील मंडळाच्या १८ गट कार्यालयांच्या स्तरावर प्रतिवर्षी माहे ऑक्टोबरमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीनिमित्त "प्राथमिक कामगार भजन स्पर्धा" पुरूष आणि महिला अशा दोन विभागात आयोजित करण्यात येते. या स्पर्धेतील प्रथम पारितोषिक विजेत्या भजन संघाची "राज्यस्तरीय स्पर्धा" राष्ट्रपिता महात्मा गांधी पुण्यतिथीदिनी (हुतात्मा दिन) दिनांक २९ व ३० जानेवारी असे दोन दिवस आयोजित करण्यात येते.

## लोकनृत्य स्पर्धा

भारतीय लोककलेची नव्या पिढीला माहिती व्हावी, विविध पारंपारिक नृत्ये एकत्रित पाहता यावीत तसेच कलावंतांच्या नृत्य कलागुणांना वाव मिळावा व स्पर्धेच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता जोपासली जावी या उद्देशाने महाराष्ट्रातील मंडळाच्या १८ गट कार्यालयांच्या स्तरावर प्रतिवर्षी लोकनृत्य स्पर्धेचे आयोजन केले जाते. प्राथमिक स्पर्धेत प्रथम आलेल्या संघांची राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात येते.

# साहित्य विषयक कार्यक्रम

## कामगार साहित्य संमेलन

साहित्यविषयक कलागुणा जोपासणाऱ्या नवोदित कामगार लेखक/कवी/साहित्यिक आणि सर्वसाधारण कामगार वर्ग यांच्यासाठी हक्काचे व्यासपीठ म्हणून सन १९९२ पासून कामगार साहित्य संमेलन हा उपक्रम मंडळाने सुरू केला. पहिले कामगार साहित्य संमेलन कविवर्य पद्मश्री नारायण सुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे संपन्न झाले. साहित्य संमेलनात साहित्य दिंडी, साहित्य विषयक प्रदर्शन, विविध प्रबोधनात्मक विषयावर मान्यवर वक्त्यांचे परिसंवाद, कथाकथन, निमंत्रितांचे कवी संमेलन, नवोदित कामगार कवींचे कवी संमेलन आदि कार्यक्रमांचा अंतर्भाव असतो.

## कामगार साहित्य लेखन स्पर्धा

कामगारांच्या साहित्यिक कलागुणांना वाव देण्यासाठी मंडळाच्या वतीने सदर स्पर्धा आयोजित केली जाते. यात कथा (हरी नारायण आपटे पुरस्कार), कविता (नारायण सुर्वे पुरस्कार), कांदबरी (अण्णाभाऊ साठे पुरस्कार), वैचारिक लेख (लोकहितवादी पुरस्कार), नाटक (मामा वरेरकर पुरस्कार), एकांकिका (ग. त्र्यं. माडखोलकर पुरस्कार) अशा सहा विभागात स्पर्धा घेण्यात येते. कामगार साहित्य संमेलनात विजयी स्पर्धकांना गौरविण्यात येते.

## कवी संमेलन

कामगारांच्या साहित्यविषयक कलागुणांना चालना मिळावी या उद्देशाने गटस्तरावर कवी संमेलनाचे आयोजन केले जाते. तसेंच कामगार साहित्य संमेलनात नवोदित कामगार कवींचे कवी संमेलन व निमंत्रित कवी संमेलनाच्या माध्यमातून व्यासपीठ निर्माण करून दिले जाते.

## साहित्य प्रकाशन अनुदान योजना

कामगारांच्या साहित्य विषयक सुप्त कलागुणांना वाव देऊन त्यांच्याकडून चांगले साहित्य निर्माण व्हावे या उद्देशाने सदर योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. कामगारांच्या प्रकाशित साहित्यासाठी रुपये १० हजार अनुदान दिले जाते.





# शैक्षणिक योजना



## सर्वसाधारण शिष्यवृत्ती

**उद्दिष्ट व स्वरूप :** कामगार कुटुंबातील विद्यार्थ्यांना इ. १० वी पासून पुढील पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या कामगारांच्या पाल्यांना या योजनेचा लाभ मिळतो. मागील परीक्षेत किमान ६० किंवा अधिक गुण मिळणे आवश्यक आहे.

**शिष्यवृत्तीचे स्वरूप**

| | |
|---|---|
| अ) इ. १० वी ते १२ वी | : रु. २,०००/- |
| ब) इ. १३ वी ते १५ वी | : रु. २,५००/- |
| क) पदव्युत्तर पदवी | : रु. ३,०००/- |
| ड) १० वी नंतरचे तांत्रिक/वैद्यकिय/अभियांत्रिकी | : रु. २,५००/- |
| ई) १२ वी नंतरचे डिग्री कोर्स तांत्रिक/वैद्यकिय/अभियांत्रिकी | : रु. ५,०००/- |

## क्रीडा शिष्यवृत्ती

**उद्दिष्ट व स्वरूप :** कामगार किंवा कामगार कुटुंबीय यांना राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळविल्यास शिष्यवृत्ती देण्याची योजना आहे.

**शिष्यवृत्तीचे स्वरूप :**

| राज्यस्तरावर : | राष्ट्रीयस्तरावर : | आंतरराष्ट्रीय स्तरावर : |
|---|---|---|
| प्रथम : रु. ५,०००/- | प्रथम : रु. ७,०००/- | रु. १५,०००/- |
| द्वितीय : रु. ३,०००/- | द्वितीय : रु. ५,०००/- | |
| तृतीय : रु. २,०००/- | तृतीय : रु. ३,०००/- | |

## परदेशी उच्चशिक्षण शिष्यवृत्ती

**उद्दिष्ट व स्वरूप :** कामगार कुटुंबातील विद्यार्थ्यांना परदेशात पदव्युत्तर शिक्षणासाठी वार्षिक परीक्षेत किमान ६० किंवा अधिक गुणांना उत्तीर्ण झाल्यास पाल्यांना शिष्यवृत्ती देण्याची योजना आहे. सदर योजनेचा लाभ एका विद्यार्थ्यास एकदाच दिला जातो.

**शिष्यवृत्तीचे स्वरूप :** रु. ५०,०००/-

## पाठ्यपुस्तक अर्थसहाय्य

**उद्दिष्ट व स्वरूप :** कामगार कुटुंबातील विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी पासून पदवी, पदव्युत्तर पदवी तसेच वैद्यकीय, अभियांत्रिकी, आयटीआय इ. अभ्यासक्रमांच्या क्रमिक पाठ्यपुस्तक खरेदीस ५० टक्के रक्कम अर्थसहाय्य म्हणून देण्याची योजना आहे. वार्षिक उत्पन्न रुपये ३,००,०००/- च्या आत आहे अशा कामगार कुटुंबिय विद्यार्थ्यांना लाभ घेता येईल.

**लाभाचे स्वरूप :**

१० वी / १२ वी अभियांत्रिकी (डिप्लोमा/डिग्री), तांत्रिक, वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रुपये २,५००/- पर्यंत व इतर वर्गासाठी रुपये १,५००/- पर्यंत अर्थसहाय्य दिले जाते.

## एमएस-सीआयटी प्रोत्साहनपर अनुदान

**उद्दिष्ट व स्वरूप :** महाराष्ट्र शासनाच्या एमएस-सीआयटी परीक्षेची उपयुक्तता/अनिवार्यता लक्षात घेऊन एमएस-सीआयटी परीक्षा ६० टक्के किंवा अधिक गुणांनी उत्तीर्ण होणाऱ्या कामगार/ कामगार कुटुंबियांना (मुलगा, मुलगी, पत्नी) या योजनेद्वारे अर्थसहाय्य दिले जाते.

**लाभाचे स्वरूप :**

एमएससीआयटी शुल्काच्या ५० टक्के रक्कम या योजनेअंतर्गत लाभार्थींना देण्यात येते. अपंगांना १०० टक्के अर्थसहाय्य दिले जाते.

## स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी अर्थसहाय्य

MPSC स्पर्धा परीक्षेचा पहिला टप्पा (पूर्व परीक्षा) उत्तीर्ण होणाऱ्या कामगार कुटुंबीय पाल्यांना या योजनेअंतर्गत अर्थसहाय्य दिले जाते.

**लाभाचे स्वरूप :** रु. ५,०००/-

UPSC स्पर्धा परीक्षा पहिला टप्पा (पूर्व परीक्षा) उत्तीर्ण होणाऱ्या कामगार कुटुंबीय पाल्यांना या योजनेअंतर्गत अर्थसहाय्य दिले जाते.

**लाभाचे स्वरूप :** रु. ८,०००/-

## शासनमान्य ग्रंथपालन प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्ग

कामगार व कामगार कुटुंबातील मुलांमुलींकरिता मुंबई, ठाणे, चिपळूण, पुणे, नाशिक, सोलापूर, औरंगाबाद, जळगाव, अकोला, अमरावती, नागपूर इ. ठिकाणी शासनमान्य "ग्रंथपालन प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्ग" दरवर्षी आयोजित केले जातात.





## शिवणयंत्र अनुदान

मंडळाच्या शिवण वर्गात तसेच मंडळाच्या सरकार मान्य शिवण वर्गाच्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या कामगार किंवा कामगार कुटुंबीय महिलांना या योजनेअंतर्गत अनुदान तत्त्वावर शिवणयंत्र पुरवण्यात येते.

**लाभाचे स्वरूप :** शिवणयंत्राच्या ९० टक्के रक्कम अनुदान व केवळ १० टक्के रक्कम अर्जदाराकडून घेऊन नवीन शिवणयंत्र पुरविले जाते.

## कामगार कुटुंबातील अपंग व्यक्तींसाठी कल्याणकारी योजना

- कामगार कुटुंबातील अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेकरिता गुणानुक्रम अथवा टक्केवारीची अट न घालता प्राधान्याने शिष्यवृत्ती दिली जाते.
- पाठ्यपुस्तक सहायता योजने अंतर्गत १०० टक्के अनुदान देण्यात येते.
- एमएस-सीआयटी परीक्षेत उत्तीर्ण झाल्यास त्यांनी भरलेल्या एकूण शुल्काच्या १०० टक्के रक्कम अनुदान म्हणून दिली जाते.
- मंडळाच्या सर्वसाधारण शिष्यवृत्ती, परदेशी उच्चशिक्षण शिष्यवृत्ती, क्रीडा शिष्यवृत्ती योजना यामध्ये अर्ज प्राप्त झाल्यास प्राधान्यक्रम देण्यात येतो.

# आरोग्यविषयक योजना



## असाध्यरोग उपचार सहाय्यता

**उद्दीष्ट व स्वरूप :** कामगार किंवा त्याच्या कुटुंबातील पत्नी, मुलगा, मुलगी, आईवडील यांना मूत्रपिंड, कर्करोग, हृदयरोग, एड्स, क्षय यांसारख्या असाध्य आजार व शस्त्रक्रियेसाठी सदर योजनेच्या माध्यमातून औषधोपचाराकरिता आर्थिक मदत देण्यात येते.

**लाभाचे स्वरूप :**

| क्र. | रूग्णांचा झालेला खर्च | आर्थिक सहाय्य |
|---|---|---|
| १ | रू. १०,००० ते २५,०००/- पर्यंत | ५,०००/- |
| २ | रू. २५,००१ ते ५०,०००/- पर्यंत | १०,०००/- |
| ३ | रू. ५०,००१ ते ७५,०००/- पर्यंत | १५,०००/- |
| ४ | रू. ७५,००१ ते १,००,०००/- पर्यंत | २०,०००/- |
| ५ | रू. १,००,००० पेक्षा जास्त खर्च | २५,०००/- |

## अपघातात विकलांग झालेल्या कामगारास आर्थिक मदत

**उद्दिष्ट व स्वरूप :** या योजनेमध्ये कंपनीतून घरी किंवा घरून कंपनीत जाताना एखादा कामगार अपघातात सापडून त्यास विकलांगता आल्यास किंवा त्यांच्या शरीराचा कोणताही भाग अपंग झाल्यामुळे उपजीविकेचे कोणतेही काम करण्यास असमर्थ झालेल्या अशा कामगारांना मदत देण्याची योजना आहे.

**लाभाचे स्वरूप :** रुपये १० हजारापर्यंत आर्थिक मदत मंडळाकडून देण्यात येते.

## आत्महत्या केलेल्या कामगारांच्या कुटुंबीयांना अर्थसहाय्य

उद्दिष्ट व स्वरूप : कारखाने/गिरणी बंद झाल्याने आर्थिक दुरावस्थेमुळे आत्महत्या केलेल्या कामगाराच्या पत्नीस सदर योजनेद्वारे अर्थसहाय्य देण्यात येते.

**लाभाचे स्वरूप :** या योजनेअंतर्गत रुपये १ लाख पर्यंतची मदत कामगार कुटुंबियांना देण्यात येते.






# क्रीडा स्पर्धा

## औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी राज्यस्तरीय व महिलांसाठी खुली कबड्डी स्पर्धा

मंडळाच्या वतीने औद्योगिक आणि व्यावसायिक पुरूष कर्मचा-यांसाठी राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे १९९४ पासून व महिलांसाठी खुल्या कबड्डी स्पर्धेचे सन २००० पासून प्रतिवर्षी आयोजन केले जाते. स्पर्धेत भाग घेणारे पुरूष विभागातील संघ हे महाराष्ट्र कामगार कल्याण अधिनियम १९५३ अन्वये कामगार कल्याण निधी भरणारे औद्योगिक कारखाने, उद्योग धंदे व व्यावसायिक व्यवस्थापनेतील कामगारांचे असतात. महिलासांठी ही अट शिथिल करण्यात आलेली आहे.



## कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धा

मंडळाच्या वतीने औद्योगिक आणि व्यावसायिक कामगारांसाठी स्वतंत्र राज्यस्तरीय कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले जाते. स्पर्धेकांची प्रवेशिका आस्थापने मार्फत स्विकारली जाते. कामगार व कुमार केसरी विजेत्यांना रोख पारितोषिकासह चांदीची गदा, मानाचा पट्टा व प्रशस्तिपत्र दिले जाते. कामगार केसरी, कुमार केसरी स्पर्धे व्यतिरिक्त पाच वजनी गटातही या स्पर्धेचे आयोजन केले जाते. स्पर्धकांना कमीत कमी दराचा प्रवास खर्च व दैनिक भत्ता दिला जातो.

# मंडळाचे पुरस्कार

## गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार

साहित्य, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, आदी क्षेत्रातील विशेष योगदानासाठी सन १९७८-७९ पासून मंडळाकडून गुणवंत कामगार पुरस्कार कामगारांना दिला जातो. कंपनीत कमीत कमी ५ वर्ष सेवा झालेल्या कामगारांस या पुरस्कारासाठी अर्ज करता येतो. प्राप्त अर्जातून नियम व अटीची पूर्तता केलेल्या तसेंच मुलाखतीमध्ये मिळालेल्या गुणवत्तेनुसार ५१ अर्जदारांची गुणवंत कामगार पुरस्कारासाठी निवड केली जाते.

**पुरस्काराचे स्वरूप** : रु. १५,०००/-, स्मृतीचिन्ह व मानपत्र.

## कामगार भूषण पुरस्कार

गुणवंत कामगार पुरस्कार मिळाल्यानंतर पुढील दहा वर्षे साहित्य, सामाजिक, शैक्षणिक, क्रिडा, आदि क्षेत्रात योगदान देणाऱ्या कामगारांस कामगार भूषण पुरस्कार मंडळ सन २००० पासून प्रदान करीत आहे.

**पुरस्काराचे स्वरूप** : रु. २५,०००/-, स्मृतीचिन्ह व मानपत्र

## रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे कामगार मित्र पुरस्कार

समर्पित वृत्तीने कार्य करणाऱ्या व्यक्ती / संस्थांना अशा पुरस्कारासाठी अर्ज करायला लावणे उचित नसल्याने समाजातील विविध स्तरातील मान्यवर, उद्योग संस्था, कामगार संघटना यांच्याकडून विहित नमून्यात माहिती मागवून या कार्यालयास प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारे गुणवत्तेनुसार पुरस्कारार्थी संस्था व व्यक्तीची निवड केली जाते. हा पुरस्कार सन २००० पासून मंडळ प्रदान करीत आहे.

**पुरस्काराचे स्वरूप** : रु. ५१,०००/- (व्यक्ती), रु. ५१,०००/- (संस्था), स्मृतीचिन्ह व मानपत्र.



# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

## मंडळ आणि मंडळाच्या विविध कार्यांविषयी अधिक माहितीसाठी संपर्क कार्यालये

### मध्यवर्ती कार्यालय

कल्याण आयुक्तांचे कार्यालय
महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन
६१५, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, मुंबई- ४०० ०१३.
दूरध्वनी : ०२२-२४३०६७१७, २४३१८८१२
फॅक्स : ०२२-२४२१००१९
इमेल : mlwbwc@gmail.com

### विभागीय कार्यालये व अंतर्गत येणारी गटकार्यालये

**सहायक कल्याण आयुक्त**
विभागीय कार्यालय, मुंबई
ललित कला भवन, गोविंदजी केणी रोड, अपना बाजार मागे, नायगाव, मुंबई ४०००१४.
दूरध्वनी : ०२२-२४१२१३२५ ईमेल : mlwbnaigaon14@gmail.com

| | |
|---|---|
| **कामगार कल्याण अधिकारी**<br>गट कार्यालय, नायगाव<br>ललित कला भवन, गोविंदजी केणी रोड, अपना बाजार मागे, नायगाव, मुंबई ४०००१४.<br>दूरध्वनी : ०२२-२४१६८७९२<br>ईमेल : mlwbconaigaom@gmail.com | **कामगार कल्याण अधिकारी,**<br>गट कार्यालय, अंधेरी<br>कामगार कल्याण भवन, गुंदवली, गांवठाण, आझाद रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०६९.<br>दूरध्वनी : ०२२-२६८३१४०१<br>ईमेल : mlwbcoandheri@gmail.com |

**कामगार कल्याण अधिकारी**
गट कार्यालय, वरळी
ललित कला भवन, जांबोरी मैदान, वरळी, मुंबई - ४०० ०१८.
दूरध्वनी : ०२२-२४९८२८७१ ईमेल : mlwbcoworli@gmail.com

**सहायक कल्याण आयुक्त**
विभागीय कार्यालय, ठाणे
कामगार कल्याण भवन, कन्नमवार नगर क्र. २, विक्रोळी (पूर्व), मुंबई ४०० ०८३
दूरध्वनी : ०२२-२५७७६७५१ ईमेल : mlwbthane@gmail.com

| | |
|---|---|
| **कामगार कल्याण अधिकारी**<br>गट कार्यालय, ठाणे<br>कामगार कल्याण भवन, कन्नमवार नगर क्र. २, विक्रोळी (पूर्व), मुंबई ४०० ०८३.<br>दूरध्वनी : ०२२-५७७१६६३<br>ईमेल : mlwbcothane@gmail.com | **कामगार कल्याण अधिकारी,**<br>गट कार्यालय, चिपळूण<br>साई सेंटर, मुंबई गोवा रोड, वनश्री हॅटेलजवळ, चिपळूण, जिल्हा : रत्नागिरी<br>दूरध्वनी : ०२३५५-२५०६११<br>ईमेल : mlwbcochiplun@gmail.com |